महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३११ वा | दिनांक : १०/१०/२०२५ | वार : शुक्रवार

## पंतप्रधान मोदींच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे संबंध आणखी मजबूत झाले : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्लोबल समिटमध्ये सहभाग नोंदवला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, भारत आणि जर्मनी यांचा एकमेकांवर विश्वास आहे. भारत आणि यूरोपियन संघामध्ये मुक्त व्यापार करार होणे खूप गरजेचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत आणि जर्मनीमधील व्यापार संबंध आणखी मजबूत झाले आहेत. भारत आणि जर्मनी यांच्यातील धोरणात्मक भागीदारीला २५ वर्षे पूर्ण झाले आहेत, या पार्श्वभूमीवर फडणवीस बोलत होते.

जर्मनी येथे सुरू असलेल्या ग्लोबल समिटमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभाग नोंदवला होता. यावेळी फडणवीस म्हणाले, मला असे वाटते या व्यासपीठाच्या माध्यमातून भारत आणि जर्मनीमधील धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे भारत आणि जर्मनीमधील संबंध आणखी मजबूत झाले आहेत.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, जर्मनी अभियांत्रिकीमध्ये उत्कृष्टता आणि अचूकता आणते तर भारत कौशल्ये, युवा ऊर्जा आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा प्रदान करतो. वोक्सवॅगन, बीएमडब्ल्यू, मर्सिडीझ सारख्या जर्मन कंपन्यांनी महाराष्ट्राला आपले दुसरे घर बनवले आहेत, आणि या गुंतवणुकीतून रोजगाराची देखील निर्मिती होत आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी जर्मनीमधील गुंतवणूकदारांना आवाहन करताना आमच्या जर्मन मित्रांनो, विकास, नवोपक्रम आणि दीर्घकालीन यशात महाराष्ट्र तुमचा भागीदार आहे. आपण सर्वजण एकत्रितपणे उज्ज्वल आणि सामायिक भविष्याकडे वाटचाल करूया, असेही म्हटले आहे.

## राज्यात ई-बस प्रवास होणार अधिक परवडणारा : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी महामंडळाने) प्रवाशांच्या सोयीसाठी आणि ई-बस सेवेला अधिक प्रतिसाद मिळवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता राज्यातील ई-बस प्रवाशांना मासिक व त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध होणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, या पास योजनांचा मुख्य उद्देश नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने दररोज एकाच मार्गावर प्रवास करणाऱ्या नियमित प्रवाशांना ई-बस सेवेकडे आकर्षित करणे हा आहे. सध्या महामंडळाच्या ताफ्यात ई-बस प्रकल्पातील ४४८ बस आणि शिवाई प्रकल्पातील ५० ई-बसेस कार्यरत आहेत. भविष्यात या बसेसची संख्या आणखी वाढवण्याचा मानस आहे.

अनेक प्रवाशांकडून ई-बस सेवेत पास प्रणालीची मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर महामंडळाने प्रवाशांना अधिक सोयीस्कर आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारा प्रवास देण्यासाठी ही योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

पास योजनेच्या प्रमुख वैशिष्ट्ये

उपलब्धता : ९ मीटर ई-बस, १२ मीटर ई-बस आणि ई-शिवाई सेवेमध्ये हे पासेस उपलब्ध असतील. (ई-शिवनेरी बससेवा वगळून)

मासिक पास : (३० दिवस) : २० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ३० दिवसांसाठी पास दिला जाईल.

त्रैमासिक पास : (९० दिवस) : ६० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ९० दिवसांचा पास उपलब्ध होईल.

सेवा वर्गातील लवचिकता : उच्च सेवा वर्गाचा पास (ई-बस) वापरून प्रवासी निमआराम किंवा साध्या बसमध्येही प्रवास करू शकतील.

फरक भाडे नियम : निमआराम किंवा साध्या बसच्या पासधारकांना ई-बसने प्रवास करायचा असल्यास, दोन्ही सेवांतील भाड्यातील फरक १००% दराने भरून तिकीट घेऊन प्रवास करता येईल.

महामंडळाच्या या निर्णयामुळे दैनंदिन प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि आरामदायी प्रवासासाठी ई-बसचा वापर वाढण्यास मदत होईल, असा विश्वास परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी : कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

**मुंबई** : राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना १५ टक्के इतकी भरघोस मानधन वाढ देण्यात येणार आहे. त्याबाबत शासन मान्यता देण्यात आली असून राज्यभरातील पन्नास हजारावर कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या या निर्णयामुळे राज्यभरातील कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून आनंद व्यक्त होत असून आरोग्यमंत्र्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

कर्मचाऱ्यांचा आरोग्य यंत्रणा राबवण्यामध्ये एनएचएम महत्त्वाचा वाटा असून त्यांच्या उर्वरित मागण्याबाबतही शासन सकारात्मक असल्याचे प्रकाश आबिटकर यांनी सांगितले. दहा वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना एक वेळची बाब म्हणून सेवेत कायम करणे, एनएचएम कर्मचाऱ्यांना ESIS अंतर्गत सामाजिक सुरक्षा लाभ देणे. कर्मचाऱ्यांचा गंभीर आजार,अपंगत्व, मृत्यू अशा संकटात आर्थिक सहाय्य देण्यासाठी एनएचएम कर्मचारी कल्याण निधी उभारणे, अति दुर्गम व नक्षलग्रस्त भागात कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांना विशेष भत्ता देणे, सन २०१६-१७ पूर्वी सेवेत आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनातील तफावत दूर करणे, यासह इतर मागण्याच्या बाबत शासन सकारात्मक असुन, पुढील कार्यवाहीसाठी सादर केला आहे. या निर्णयामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढेल आरोग्य विभागाची यंत्रणा अधिक परिणामकारक होईल, असा विश्वास प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागात विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन.एच.एम.) अंतर्गत अनेक पदावर कंत्राटी तत्त्वावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांची गेले अनेक वर्षापासून भरीव मानधन वाढीची मागणी होती. त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासनाने १५ टक्के मानधन वाढ देण्याचा निर्णय केला आहे.

सद्यस्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियानात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. माहे जून २०२५ च्या देय मानधनावर मानधन वाढीची गणना करण्यात येणार आहे. पंधरा टक्के पैकी पाच टक्के मानधन वाढ सरसकट लागू होणार असून, उर्वरित मानधन वाढ ही कर्मचाऱ्यांच्या कार्यमूल्यांकन (परफॉर्मन्स रिपोर्ट) नुसार करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com

# शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर कौशल्य प्राप्त करणे गरजेचे : नरेश गडम






**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर कौशल्य प्राप्त करणे गरजेचे आहे, विद्यार्थ्यांनी बँकिंग फायनान्स तसेच उद्योग सेवा क्षेत्रामध्ये असलेल्या करिअर संधी आणि त्यासाठी आवश्यक असलेली कौशल्य अंगीकृत करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन स्टेट बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर श्री नरेश गडम यांनी प्रतिपादन केले.

ते दिनांक 08 ऑक्टोबर रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित वाणिज्य मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय अस्वले तर प्रमुख उपस्थित म्हणून श्री अजित काळे जनसंपर्क अधिकारी भारतीय स्टेट बँक यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी कॉमर्स विभागात वर्षभर चालणाऱ्या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो .तसेच महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या साठी अनेक उपक्रम चालवले जात आहेत.

त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. अजित आष्टे यांनी प्रास्ताविक केले. तसेच वाणिज्य मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. विजयकुमार मुळे, प्रा. मनोज गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

तसेच सुरज सुरवसे, ऋतुजा गायकवाड, प्रियंका इंगळे ,सना चौधरी, सुरज उमर्गी या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. साक्षी गायकवाड तर आभार प्रदर्शन कु. सानिका जाधव यांनी केले.

या कार्यक्रमास डॉ. खंडु मुरळीकर, प्रा. ओम प्रकाश पवार प्रा. संध्याराणी चौगुले प्रा. अक्षता बिराजदार प्रा. विद्या गायकवाड प्रा. सचिन गायकवाड तसेच वाणिज्य विभागातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.


## उपायुक्त आणि शिक्षण विस्तार अधिकारी यांची मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालयास भेट





**छत्रपती संभाजीनगर :** आज दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजीउपायुक्त मा. श्री. अंकुश पांढरे साहेब तसेच शिक्षण विस्तार अधिकारी मा. श्री. रामनाथ थोरे साहेब यांनी मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे भेट दिली.

त्यांनी परीक्षेस उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांचा आढावा घेतला व शाळेतील संगीत उपक्रम, विज्ञान प्रयोगशाळा ची पाहणी केली, तसेच D Mart फाउंडेशन तर्फे स्थापित संगणक कक्ष व वाचनालयालाही भेट देऊन शाळेच्या एकूण शैक्षणिक व भौतिक परिस्थितीबाबत समाधान व्यक्त केले.







## राजीव गांधी कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, करमाड येथे "विकसित भारत २०४७" उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन

**करमाड :** राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे "विकसित भारत २०४७" या केंद्र शासनाच्या उपक्रमातर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या माध्यमातून दि.१७ सप्टेंबर २०२५ ते दि.०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले होते.

या उपक्रमाअंतर्गत "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत महाविद्यालय परिसर, करमाड गाव परिसर, श्रीराम मंदिर परिसर तसेच ग्रामीण रुग्णालय करमाड या ठिकाणी वेगवेगळे तीन दिवस महाविद्यालयाचे स्वयंसेवक विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील कर्मचारीवर्ग तसेच गावातील नागरिक या सर्वांच्या सहकार्याने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. विकसित भारत २०४७ अंतर्गत महाविद्यालयामध्ये विविध दिवशी तीन व्याख्याने आयोजित करण्यात आली.

सरस्वती भुवन महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील माजी प्राचार्य प्रा. मकरंद पैठणकर यांनी "विकसित भारत २०४७" या विषयावर, तर डॉ. दिनेश कचकुरे यांनी "शिवछत्रपतींचे गडकिल्ले", तसेच श्री चेतन डांगे यांनी "सॉफ्ट स्किल" अंतर्गत व्यवसाय प्रशिक्षणातून नोकरीच्या संधी या विषयावर व्याख्यान पार पडले.

तसेच या उपक्रमांतर्गत दिनांक १७ सप्टेंबर रोजी "मराठवाडा मुक्ती संग्राम दिन" निमित्त विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, त्याचबरोबर "राष्ट्रीय सेवा योजना दिन" निमित्त महाविद्यालयांमध्ये तसेच ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

तर दिं २५ सप्टेंबर रोजी "लायन्स क्लब छत्रपती संभाजीनगर" व ग्रामपंचायत कार्यालय करमाड, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले या शिबिरामध्ये जवळपास १८० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. एस एस मुळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. कालिदास फड, डॉ. नितीन मुळे, डॉ. किशोर काळे, उपप्राचार्य प्रा. मनोज देवकर, प्रा.डॉ. बाळासाहेब लिहिणार, प्रा.डॉ.अश्विनकुमार चिंचोलीकर, डॉ. नरेश डहाळे, डॉ. लक्ष्मीकांत दांडगे, डॉ. जयश्री पाटील डॉ. सौरभ चव्हाण, डॉ.अमित राऊत, डॉ.अतुल मोरे, डॉ. पठाण डॉ. गोल्डे, डॉ.पोटदुखे, प्रा. माठे, प्रा. शिंदे, प्रा. होळकर, डॉ. मस्के, प्रा. भावसार, प्रा. घोडके, प्रा. अर्जुन चव्हाण, प्रा. गणेश कुऱ्हाडे, प्रा.लांडगे, श्री. प्रसन्न वैद्य, श्रीमती जोशी रोहिणी, श्री भगवंत देशपांडे, श्री. कैलास जाधव, श्री. रमेश जाधव, श्री.अविनाश साळवे, श्रीमती सुनिता पारेकर, श्रीमती अलका कुलकर्णी, श्री मधुकर राठोड आणि श्री ज्ञानेश्वर जाधव यांनी कार्यक्रणाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com

# कालिकादेवी विद्यालय कबड्डी स्पर्धेत जिल्ह्यातून अव्वल...




**शिरूर (कासार) :** 'महाराष्ट्र शासनाच्या' शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय ,महाराष्ट्र राज्य, पुणे.यांच्या अधिनस्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा विभाग, जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने, श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल,जि.बीड येथे जिल्हास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते.

ही शालेय कबड्डी स्पर्धा वयोगट 14 वर्षाखालील मुलींसाठी होती. कालिकादेवी विद्यालयाचे,प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार 14 वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाने सहभाग घेऊन,या स्पर्धेत 'प्रथम क्रमांक' पटकावला.

यामुळे कालिकादेवी विद्यालय,बीड जिल्ह्यातून अव्वल ठरले आहे.या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत जिंकलेल्या स्पर्धकांची विभागीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या शालेय स्पर्धेत बीड जिल्ह्यातील एकूण 11 नामांकित शाळेने सहभाग घेतला होता.मात्र कालिकादेवी विद्यालयाच्या मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली आहे.

विद्यालयामधील, क्रीडा शिक्षक श्री रविंद्र बडे प्रा.बाळासाहेब खटाणे व श्रीराम इंगळे यांनी मुलींच्या कबड्डी स्पर्धेची तयारी अतिशय मेहनतीने करून घेतली होती.यामुळे विद्यालयातील मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळाल्यामुळे, बीड जिल्ह्यामध्ये कालिकादेवी विद्यालयाचे नाव लौकिक झाले आहे.यामुळे कालिकादेवी विद्यालयातील कबड्डी स्पर्धेतील स्पर्धकांना विभागीय स्पर्धेत जाण्याचा मान मिळाला आहे.


तेव्हा आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर, मा.रोहीत (दादा) क्षीरसागर, प्रशासन अधिकारी मा.डॉ.राजू मचाले,सहाय्यक प्रशासन अधिकारी मा.योगेश पवार, कार्यवाहक मा.एम.ए. राऊत, प्राचार्य केशव भांगे साहेब, उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे, रवी जायभाये,राजेंद्र डोंगरे व सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, परिसरातील क्रीडाप्रेमी व सर्व विद्यार्थी यांनी विद्यालयाचे आणि विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.







# कवी ललित अधाने यांच्या 'माही गोधडी छप्पन भोकी' या कवितासंग्रहाला 'कवयित्री शांता शेळके साहित्य गौरव पुरस्कार' जाहीर




**छत्रपती संभाजीनगर :-** दि.९ (प्रतिनिधी) पुणे जिल्ह्यातील मंचर येथील "कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठान" या नामांकित संस्थेच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा मानला जाणारा साहित्य पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला. 'कवयित्री शांता शेळके साहित्य गौरव पुरस्कार- २०२३-२४' साठी छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध कवी व मराठी भाषा, साहित्याचे अभ्यासक डॉ. ललित अधाने यांच्या 'माझी गोधडी छप्पन भोकी' या कवितासंग्रहाची निवड करण्यात आली. अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दत्ताजी पायमोडे यांनी पत्रांद्वारे दिली.

महाराष्ट्रातील साहित्य क्षेत्रात मान्यताप्राप्त पुणे जिल्ह्यातील मंचर येथील "कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठान" या संस्थेच्या वतीने सातत्याने मराठीतील दर्जेदार कलाकृतींना विविध वाङ्मय पुरस्कार प्रदान केले जातात.

पुरस्काराचे हे बारावे वर्ष असून काही अपरिहार्य कारणामुळे सन २०२३ व २०२४ या कालावधीतील पुरस्कारांची निवड करायची राहून गेली होती, ती नुकतीच संस्थेच्या वतीने करण्यात आली. यात कवी ललित अधाने यांच्या 'माही गोधडी छप्पन भोकी' - (२०२३) या कवितासंग्रहांची निवड करण्यात आली आहे.

कवी ललित अधाने हे विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर येथे मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत असून नव्वदोत्तर पिढीतील एक महत्त्वाचे कवी आणि समीक्षक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या 'माही गोधडी छप्पन भोकी' या कवितासंग्रहाला मिळालेला हा सतरावा पुरस्कार असून सध्या साहित्यवर्तुळात हा काव्यसंग्रह चांगलाच गाजत आहे.

बदललेल्या ग्रामीण जीवनशैलीचा वेध घेताना कवी डॉ.ललित अधाने यांची कविता वाचकांच्या मनात विद्रोहाचा बिगुल वाजवते. ग्रामीण जीवनातील प्रश्न हाताळताना विद्रोहाचा आगाजा देणारी अधाने यांची कविता अत्यंत आश्वासक आणि प्रेरणादायी आहे.

रोख रक्कम ,शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून या महिन्यातील २६ तारखेला सदरील पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक अधाने यांना प्रदान करण्यात येणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


## आई

आई म्हणजे
समईतील वाती
मुलांसाठी तेवते
संस्काराच्या ज्योती

आई म्हणजे
मायेचा सागर
राबराब राबूनी
कष्टाचा करी जागर

आई म्हणजे
अमृताची धार
तिचा प्रेमळ हात
सदा पाठीवर

आई म्हणजे
वात्सल्याची मूर्ती
तिच्या आशीर्वादाने
होई स्वप्नांची पूर्ती

आई म्हणजे
गीता आणि पुराण
मुलांच्या सुखासाठी
करी जीवाचे रान

आई म्हणजे
जीवनाचा गुरू
मुलांना घडविणारा
ज्ञानाचा कल्पतरू


**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106


## चुकता अंदाज माझा

साप अस्तनीतला फुलला
वर वर बोलून गोड
त्याने खरा घात केला

सूर्य ढगाआड जाता
जोर घुबडांचा वाढला
काळोखाशी लढण्या तेव्हा
दिवा एकटा पेटला

भेकडाने पाठीवरती
चालाखीने वार केला
निधडी छाती उभी ठाकता
क्षणात पसार झाला

दुःख उरी गमावल्याचे
क्षणोक्षणी वाढत गेले
हक्काचे आकाश सारे
मोजण्याचे राहून गेले


**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**
**मो.९४०३३८४८८९**







## हे देवा

मया, माय बापाला
जमलच नाही
येण्या तुझ्या दारी
माय माझी जमेल तशी
करते तुझी सेवा
हे देवा
देवा विठ्ठला...

माय माझी सांगे तुला
संसार...
संसार माझा
हीच माझी वारी
हीच माझी पंढरी
तुला सांगते रे देवा
हे देवा
देवा विठ्ठला....

आयुष्याचे उन्हाळे
भोगत आहे अजून तरी
सावड काढून येईल
देवा तुझ्या रे दारी
जोडीने येणार देवा
वारीतून तुझ्या दर्शनाला
असा उभा नको राहू दारात
आमची वाट पाहत
रुक्मिणी मायला माझ्या
तुझा जरा वेळ दे
बापा विठ्ठला
हे देवा
देवा विठ्ठला...


**लक्ष्मण वाल्डे**
**कन्नड**
छत्रपती संभाजीनगर
मो.नं:8888606068


## वन्यजीव सप्ताहानिमित्त बहिरगाव शाळेत विद्यार्थ्यांची सृजनशील कलाकृती

**कन्नड (प्रतिनीधी) :** जिल्हा परिषद प्रशाला, बहिरगाव (ता. कन्नड) येथे वन्यजीव सप्ताह निमित्त इको क्लब व राष्ट्रीय हरित सेना यांच्या संयुक्त विद्यमाने एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांकडून विविध वन्यजीवांचे आकर्षक मुखवटे तयार करून घेण्यात आले. कलाशिक्षक श्री. सलीम अत्तार यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी प्रचंड उत्साहाने हत्ती, वाघ, सिंह, मोर, ससा , अस्वल अशा विविध प्राण्यांचे सुंदर आणि वास्तवदर्शी मुखवटे तयार केले.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना वन्यजीव संवर्धन व पर्यावरण रक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना "वन्यजीव आपले मित्र — त्यांचे रक्षण आपली जबाबदारी" हा संदेश देत वन्यजीवांविषयी जनजागृती करण्यात आली.यामध्ये ज्ञानेश्वरी शेजवळ, तन्वी जाधव, मंगेश घोरपडे, भावेश पवार, रुद्र शेजवळ, दर्शन बनकर, वैष्णवी जाधव, अर्णव पवार, तेजश्री रावते, यश जाधव, संचिता बनकर, विश्वजीत सोनवणे, अक्षरा कांबळे, अनुजा बनकर, अपूर्वा पवार आणि शिवकन्या दाबके, भाग्यश्री जाधव या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट व आकर्षक मुखवटे तयार केले.या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तु देऊन शाळेच्या वतीने गौरविण्यात आले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप शिक्षक दिलीप महाजन, कुलभुषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नुतन पवार , शाम खोसरे, सलिम आतार ,किरण पाटील, राधेशाम शर्मा, स्वप्नील गांगुर्डे, गणेश बल्हाळ, रविंद्र ठाकरे, किसनाबाई गोरे, सविता कुंटे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे मनापासून कौतुक केले

## तिफण वाचक चळवळतर्फे तिफण साहित्य संवाद उपक्रमाचे आयोजन

**कन्नड [ प्रतिनिधी ) :** साहित्य, वाचन आणि चिंतन याला प्रेरणा देणाऱ्या तिफण वाचक चळवळ तर्फे, तिफण साहित्य संवाद उपक्रमाचे ऑनलाईन आयोजन करण्यात येणार आहे.

मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेशी नव्या पिढीचा संवाद घडवून आणण्यासाठी आणि नवोदित लेखकांना एक खुले व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी तसेच वाचन चळवळ वृद्धिंगत होवून लेखक - वाचक घडावेत या उद्देशाने हा उपक्रम राबवला जात आहे.

तिफण त्रैमासिक व तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद एक विचारशील आणि प्रयोगशील साहित्य चळवळ असून यांच्या पुढाकारातून या उपक्रमाला सुरुवात झाली आहे. संवाद, सर्जनशीलता, आणि समकालीन साहित्य विचार यांचं एकत्रित मंच म्हणून हा उपक्रम ठरेल, असा आम्हास विश्वास आहे.

कार्यक्रमात काय असेल?या उपक्रमांतर्गत खालील गोष्टींचा समावेश असेल:तिफणमध्ये प्रकाशित साहित्यावर , विशेषांकावर चर्चा.समकालीन मराठी साहित्यावरील चर्चा व लेखकांशी संवाद.लेखकांचे अनुभव कथन आणि थेट संवाद.साहित्य लेखन कार्यशाळा.

वाचक-लेखक यांच्यात प्रश्नोत्तर सत्र. पुस्तकावर चर्चा. लेखक - वाचकांशी संवादकार्यक्रम ऑनलाइन माध्यमातून (Zoom / Google Meet / YouTube Live) घेण्यात येणार असून, सहभाग विनामूल्य आहे.

लवकरच तारीख , वेळ व कार्यक्रम जाहीर करू. इच्छुक लेखक , वाचक आणि साहित्य प्रेमींनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक डॉ. शिवाजी हुसे, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, समन्वयक , तिफण वाचक चळवळ चे अध्यक्ष डॉ. दिलिप बिरुटे , डॉ. रामचंद्र झाडे ,संदीप ढाकणे, सुनील डोके यांनी केले आहे.


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com

# जगातील एक अब्जाहून अधिक लोक मानसिक आजारी - आव्हाने आणि समाजाची जबाबदारी

जगभरात दरवर्षी 10 ऑक्टोबर हा दिवस जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ मानसिक आजारांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी नसून, मानसिक आरोग्याला समाजात प्राथमिकता देण्याचा एक व्यापक प्रयत्न आहे. आधुनिक जगातील दैनंदिन ताणतणाव, सामाजिक स्पर्धा, आर्थिक अस्थिरता आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढलेल्या संवादाच्या पद्धतींमुळे मानसिक आरोग्याची स्थिती गंभीर होत चालली आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) 2025 मध्ये प्रकाशित 'World Mental Health Today' अहवालानुसार, जगभरात सुमारे एक अब्जाहून अधिक लोक मानसिक आजारांनी ग्रस्त आहेत. ही आकडेवारी केवळ संख्यात्मक तथ्य नाही, तर ही मानवतेसमोरील गंभीर आव्हाने आणि मानसिक आरोग्य सेवांमध्ये असलेल्या अंतराचे स्पष्ट प्रमाण आहे.मानसिक आरोग्य समस्या ही केवळ रुग्णालयात उपचार घेण्याच्या गरजेपुरती मर्यादित नसून, ती व्यक्तीच्या संपूर्ण जीवनशैलीशी संबंधित आहे. जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या मानसिक आरोग्याच्या व्याख्येनुसार "मानसिक आरोग्य ही अशी स्थिती आहे, ज्यामध्ये व्यक्ती आपल्यातील क्षमता ओळखून तिचा व्यवस्थित उपयोग करू शकते, तसेच जीवनातील ताणतणावास सामोरे जाण्यास मानसिक आरोग्य सक्षम स्थिती आहे, मानसिक सुदृढ व्यक्ती उत्पादकपणे कार्य करू शकते आणि समाजासाठी योगदान देऊ शकते." म्हणजेच मानसिक आरोग्याचा अर्थ केवळ मानसिक आजार नसणे नव्हे, तर जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता, समाजात सक्रिय सहभाग, आणि आत्मस्वीकृती यासह व्यक्तीची पूर्ण मानसिक क्षमता आहे.मानसिक विकार अनेक प्रकारचे असतात, जसे की नैराश्य, चिंता विकार, बायपोलर डिसऑर्डर (द्विध्रुवीय विकार), स्किझोफ्रेनिया (ज्या रोगामध्ये विचार, भावना व कृती यांमध्ये फारकत पडत जाते असा मानसिक रोग), पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर (आघातानंतरचा ताण विकार), आणि व्यसनाधीनता या विकारांमुळे केवळ व्यक्तीच नाही तर त्याचे कुटुंब, समाज आणि आर्थिक स्थिती देखील प्रभावित होते. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, नैराश्य आणि चिंता विकार हे सर्वाधिक सामान्य आहेत, आणि त्यांचा परिणाम दीर्घकाळ टिकतो. मानसिक आजार हे अपंगत्वाचे दुसरे सर्वात मोठे कारण आहेत, ज्यामुळे रोजगार, उत्पन्न आणि सामाजिक सहभागावर प्रतिकूल परिणाम होतो.जागतिक पातळीवर, मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढली तरी, अजूनही अनेक लोकांना योग्य सेवा मिळत नाहीत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, मानसिक आरोग्यासाठी जागतिक आरोग्य बजेटचे फक्त 2% निधी राखीव आहे, जो आर्थिक दृष्ट्या अत्यल्प आहे. उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये प्रति व्यक्ती 65 अमेरिकन डॉलर्स इतका खर्च होतो, तर कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये केवळ 0.04 अमेरिकन डॉलर्स इतका खर्च केला जातो. या सुविधांच्या कमतरतेमुळे सुमारे 80% मानसिक आजारी लोकांना आवश्यक उपचार मिळत नाहीत.भारतामध्ये मानसिक आरोग्याचे संकट अधिक गंभीर आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षण (NMHS) 2015–16 नुसार, भारतात 18 वर्षांवरील 14% लोक मानसिक विकारांनी ग्रस्त आहेत. परंतु, केवळ 10–12% लोकांनाच उपचार मिळतात. उर्वरित 88–90% लोकांना आवश्यक उपचार मिळत नाहीत, ज्यामुळे उपचार दरी अत्यंत मोठी आहे. या सर्वेक्षणानुसार, मानसिक विकारांमध्ये नैराश्य, चिंता विकार, आणि मद्यपान विकार हे सर्वाधिक आढळले. उपचार न मिळण्याची कारणे विविध आहेत, ज्यात सामाजिक कलंक, अज्ञान, आणि उपचारांच्या उपलब्धतेची कमतरता यांचा समावेश होतो. ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा अजूनही दुर्लभ आहेत. अनेकदा मानसिक विकारांना समाजात भूतबाधा, दैवी शाप, कमजोरी अशा चुकीच्या समजुतींशी जोडले जाते. या अज्ञानामुळे रुग्णांना योग्य वैद्यकीय उपचाराऐवजी पारंपारिक उपाय, झाडफूंक, जादूटोणा किंवा धार्मिक मार्गांचा आधार घ्यावा लागतो, ज्यामुळे आजार अधिक तीव्र होतो आणि समाजातून तुटतो.महिलांचे मानसिक आरोग्य हा विशेष लक्ष देण्यासारखा भाग आहे. कौटुंबिक हिंसा, लैंगिक अत्याचार, सामाजिक असमानता, आणि घरगुती जबाबदाऱ्या यामुळे महिलांमध्ये मानसिक विकारांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत दुप्पट आहे. मातृत्वोत्तर नैराश्य देखील या समस्येचा एक गंभीर भाग आहे. या सर्व कारणांमुळे महिलांच्या मानसिक आरोग्यावर सामाजिक दृष्ट्या गंभीर परिणाम होतो आणि त्यांना उपचार घेण्यास अडचणी येतात. तरुण पिढीमध्ये मानसिक आरोग्याची स्थिती अधिक चिंताजनक आहे. शैक्षणिक दडपण, करिअरची चिंता, कौटुंबिक अपेक्षा, आणि सोशल मीडियावरील तुलना या सर्वांमुळे नैराश्य, चिंता विकार, आणि एकाकीपण यांचे प्रमाण वाढले आहे. भारतात दरवर्षी 13,000 हून अधिक विद्यार्थी आत्महत्या करतात, जी शिक्षण प्रणालीतील गंभीर त्रुटी आणि मानसिक आरोग्याविषयीच्या अज्ञानाचे स्पष्ट उदाहरण आहे.मानसिक आरोग्य सेवांमध्ये तज्ज्ञांची कमतरता, संसाधनांचा अभाव, आणि समुदाय आधारित सेवा मॉडेल्सची कमतरता यामुळे उपचार घेणे कठीण झाले आहे. भारत सरकारने 2017 मध्ये मानसिक आरोग्य सेवा कायदा (Mental Healthcare Act) लागू करून मानसिक आरोग्याला कायदेशीर मान्यता दिली आहे. यामध्ये मानसिक आरोग्य सेवा सर्वांसाठी उपलब्ध करणे, रुग्णांच्या अधिकारांचे संरक्षण करणे, आणि मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करणे यांचा समावेश आहे. District Mental Health Programme (DMHP) आणि National Mental Health Programme (NMHP) यांसारख्या कार्यक्रमांद्वारे ग्रामीण व शहरी भागात मानसिक आरोग्य सेवांचे जाळे मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी व्यापक जनजागृती करणे आवश्यक आहे. शाळांमध्ये भावनिक शिक्षण, महाविद्यालयांमध्ये मानसिक आरोग्य क्लब, आणि ग्रामपंचायतींमध्ये समुदाय आधारित समुपदेशन सुरु करणे यामुळे मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढेल. रुग्णांना योग्य उपचार मिळवण्यासाठी प्रोत्साहन मिळेल आणि सामाजिक कलंक कमी होईल. व्यक्तिगत पातळीवर मानसिक आरोग्य टिकवण्यासाठी योग, ध्यान, विपश्यना, व्यायाम, निसर्गाशी संबंध, संगीत आणि संवाद या सर्व गोष्टी अत्यंत उपयोगी आहेत. भावनिक साक्षरता वाढवणे, आत्मस्वीकृती, आणि सहानुभूती यांचा विकास देखील मानसिक आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.मानसिक आरोग्य ही केवळ वैयक्तिक समस्या नाही, तर ती सामाजिक, आर्थिक आणि सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) 2025 मध्ये प्रकाशित 'World Mental Health Today' अहवालानुसार, जगातील एक अब्जाहून अधिक लोक मानसिक आजारांनी ग्रस्त आहेत, आणि या संख्येत नैराश्य आणि चिंता विकार सर्वाधिक आहेत. या गंभीर समस्येवर उपाय शोधण्यासाठी शासन, समाज, शाळा, महाविद्यालये, कुटुंबे आणि व्यक्तींनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे, उपचारांची उपलब्धता सुनिश्चित करणे, अंधश्रद्धा दूर करणे, आणि सकारात्मक मानसिक आरोग्याचा प्रचार करणे या सर्व गोष्टी आवश्यक पाऊले आहेत.10 ऑक्टोबर रोजीचा जागतिक मानसिक आरोग्य दिन केवळ औपचारिक दिवस नसून, तो आपल्याला मानसिक आरोग्याच्या गंभीरतेची जाणीव करून देणारा आणि बदलासाठी प्रेरित करणारा दिवस आहे. प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे, आजारांवर लवकर उपचार घेणे आणि समाजातील इतर व्यक्तींना प्रोत्साहन देणे यासाठी सजग राहणे आवश्यक आहे. "मानसिक आरोग्याशिवाय आरोग्य नाही. (There is no health without mental health)" ही (WHO) जागतिक आरोग्य संघटनेची शिकवण आज आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक ठरते.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)मो. क्र. 9960103582, ईमेल – bagate.rajendra५@gmail.com